
SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2319-4766

GLOBALLY INDEXED
SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015 5.403




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

SPECIAL ISSUE OCT-DEC, 2016. VOL. 5, ISSUE -19

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

ATTESTED
PRINCIPAL
LOK.NETE GOPINATHJI MUNDE
Institute of Engineering Education & Research
Canada Corner, Nashik-422 002

IMPACT FACTOR SJIF 2015 = 5.403

**ONLINE ISSN 2278-8808** **PRINTED ISSN 2319-4766**

*AN INTERNATIONAL, PEER REVIEWED, QUARTERLY*

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

**EDITOR IN CHIEF**

**YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph. D.**
Assistant Professor, MAAER'S MIT School of Education & Research, Kothrud, Pune

**EDITOR'S**

**BAVISKAR, C. R, Ph. D.**
Director, School of Education, SRTM University Nanded.

**JACINTA A. OPARA, Ph. D.**
Center for Environmental Education
Universidad Azteca, Chalco-Mexico

**NISHIKANT JHA, Ph. D.**
Thakur Art,Commerce & Science College
Kandiwali West,Thakur village, Mumbai

**SHABIR AHEMAD BHATT, Ph. D.**
Assistant Professor, Department of Education, University of Kashmir, India

**VAIBHAV G. JADAHV, Ph. D.**
Assistant Professor, Department of Education & Extension, University of Pune.

---

**Amitesh Publishing House, Shivkrupa Residency, S. No. 5/14, Flat No 10, Dattnagar, Near Telco Colony Ambegaon (Kh), Pune. Maharashtra. 411046. India. Website: www.amiteshpublishers.in , www.srjis.com**
**Email: editor@srjis.com**

**An International Peer reviewed**
**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

**ANNUAL SUBSCRIPTION:** Individual Subscription Rate: ₹750 (Print Only); 150$; £80. Combined Subscription Rates for Online as well as Print ₹1775, 300$; £160.Individual Subscription Rate (Print & Online access): ₹3525/- for Five Year. Institutional Subscription Rate (Print & Online access): ₹ 5025/- for Five Year. If the manuscript posses Multiple Author the subsequent Price is ₹ 525 for per author. The said prices include postage. Institutional subscription includes the right for members of subscribing the institute to access the online journal no extra charges will be applied from SRJIS. Summary of the publication charges is mentioned below.

**PUBLICATION FEE:** Subscription fee should be directly Deposited / Transferred/ D. D through SBI Net Banking in favors of **Int. Scholarly Research Journal**, *Account No: 32806695852 Branch: Ambegaon (Bk). Pune, Maharashtra. INDIA, IFSC Code: SBIN0011648. MICR: 4110020, SWIFT CODE: SBININBB238.*

| Content | Online | Print | Total | Duration |
|---|---|---|---|---|
| Non Member | ₹ 1125/ | ₹ 650/- | 1775/- | One Issue |
| Individual Membership | ₹ 525/- | ₹ 3000/- | 3525/- | Three Years |
| Institutional Membership | ₹ 2000/ | ₹ 3025/- | 5025/- | Five Years |

**CLAIMS:** Claims for undelivered copies may not be made later than four months from the respective month and date of Publication.

**PERIODICITY: QUARTERLY** (JAN-MAR, APR-JUNE, JULY-SEPT, OCT- DEC)

**CHANGE IN POSTAL ADDRESS:** One month notice for change in address should be communicated, notified by Sending old postal address and current postal address to Editor in Chief by specifying the Journal Name and ISSN number through postal or e mail editor@srjis.com

Printed and Published by **Mrs. Supriya Y. Netragaonkar** on behalf of Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies.

**EDITOR IN CHIEF**
International Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies (SRJIS),

**CHIEF PATRON**

**PROF. SANJEEV A. SONWANE, Ph. D.**
HOD, Department of Education and Extension, University of Pune.
Dean, Education Faculty, Member of Management Council University of Pune.

**ASSOCIATE EDITORS**

**MEGHA M. UPLANE, Ph.D.**
Associate Professor,
Department of Education & Extension,
University of Pune.(M. S).

**SHIREESH PAL SINGH, Ph. D**
Assistant Regional Director,
Indira Gandhi National Open University
(IGNOU), Regional Center, Bhopal, (M.P.)

**MAIYO K. JULIUS, Ph. D.**
Lecturer, Department of Educational Planning and Management, Masinde Muliro University of Science and Technology, Kenya.

**ASAWARI BHAVE-GUDIPUDI, Ph. D.**
Project Director & Principal, MAEER'S MIT Vishwashanti Gurukul Teacher Training Academy,(B.Ed) Loni Kalbhor, Pune.

**EDITORIAL BOARD**

**PROF. SANDHYA GIHAR, Ph. D.**
Dean, Faculty of Education, Head, Department of Education, Indira Gandhi National Tribal University AmarKantak (MP)

**MANOJ KUMAR SAXENA, Ph. D.**
Dean, School of Education, Head, Department of Teacher Education Honorary Director, Deen Dayal Upadhyay KAUHSAL Kendra Central University of Himachal Pradesh Dharamshala (HP)

**BALJIT SINGH SEKHON, Ph. D.**
Dy. Director Sports & Head, Nagaland University (A Central Univ.) Lumami Nagaland

**JITENDER KUMAR, Ph. D.**
Head, Department of Education, M.D.U, Rohtak

**PROF. NAMRATA SHARMA, Ph. D.**
Director UGC, Academic Staff College,
Devi Ahilya Devi Vishwa Vidyalaya, Indore (M. P).

**PROF. SATEESHKUMAR DONGRE, Ph. D.**
Director, Department of Physical Education, Govt. I Gr. College, Chittguppa, Bidar, Karnataka State.

**ADVISORY BOARD**

**A. RADHKRASHAN NAIAR, Ph. D.**
Faculty Head, RGNIYD, Chennai, Tamil Nadu.

**BIMAL CHARAN SWAIN, Ph. D.**
Radhanath IASE, Cuttack, Odisha.

**PATIL VAIJAYANTA, Ph. D.**
Director & Head, School of Education,
SRTM, University, Nanded, (M.S.)

**GEETA SHINDE, Ph. D.**
Assistant Professor, Dept. of Education &
Extension, University of Pune

**KANCHAN R. CHOUDHARI, Ph. D.**
Principal, Abhinav College of
Education, Ambegaon, Pune.

**J. D. SINGH, Ph. D.**
Assistant Professor, G V (PG) College of
Education, (CTE), Sangaria, Rajasthan.

**SEEMA DHAWAN, Ph. D.**
Associate Professor, Dept. of Education HNB Garhwal Central University Srinagar, Garhwal

**VIKAS KUMAR, Ph. D.**
Assistant Professor in Education, D.A.N. College of Education, Nawanshahr. Punjab

**SARITA, Ph. D.**
Assistant Professor-II, Department of Education
M.D.U, Rohtak

**Overseas Board**

**EWA DONESCH-JEZO, Ph. D.**
Vice-Director, Institute of Teaching Foreign Languages,
Centre of Jagiellonian University, Krakow, Poland. Europe

**ALISON TAYSUM, Ph. D.**
Postgraduate Tutor EdD
School of Education, University of Leicester, 162-166 Upper New Walk, Leicester, England.

**JIM WATTERSTON, Ph. D.**
Director General, President
Australian Council for Education Leaders (ACEL), ACT Education and Training Directorate, Level 6, 220 Northbourne Ave, Braddon .Australia

**LUIS MIGUEL LÁZAROLORENTE, Ph. D.**
Catedrático de Teoría e Historia de la Educación.
Departamento de EducaciónComparada e Historia de la Educación. Facultad de Filosofía y CienciasdelaEducación. Universidad de Valencia. Spain.

**PHRA NARONG SRAKAEW, Ph. D.**
Special Lecturer, Mahachula University, Auddhya Campus.
Auddhya Province, Thailand

**MOHAMMAD REZA IRAVANI, Ph. D.**
Associate Professor, Department of Social work,
Azad University of Khomeinishahr, Islamic Azad University,
Khomeinishahr branch, Khomeinishahr, Esfahan, Iran.

**NEMAH ABDULLAH AYASH EZZI, Ph. D.**
English Department, Faculty of Education, University of Hodeidah (Yemen)

**MD. SERAZUL ISLAM, Ph. D.**
Assistant Professor (Accounting). School of Business
Bangladesh Open University, Gazipur, -1705 Bangladesh.

SJIF 2015 = 5.403

Online ISSN 2278-8808 Printed ISSN 2319-4766

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

**SPECIAL ISSUE OCT-DEC, 2016, VOL-5, ISSUE-19**


| अ. क. | प्राध्यापकाचे नाव व पेपरचे शीर्षक | पान. क. |
|---|---|---|
| | मराठी विभाग : | |
| १. | वाचनोपचार<br>*डॉ. वेदश्री विजय थिगळे* | 1-7 |
| २. | मराठी विज्ञान कादंबरी संशोधनात सामाजिक शास्त्रांचा सहभाग<br>*डॉ.पौर्णिमा बोडके* | 8-12 |
| ३. | भाषा आणि साहित्य संशोधनातील नवे मार्ग<br>*डॉ.राजेंद्र रामकृष्ण सांगळे* | 13-20 |
| ४. | मराठी साहित्य संशोधनातील नवसंधी<br>*प्रा. डॉ. पवार लता दोधू* | 21-27 |
| ५. | जागतिकीकरणात आंतरविद्याशाखीय संशोधनाचे महत्व<br>*प्रा. डॉ. सौ. उज्ज्वला भोरे* | 28-34 |
| ६. | प्रादेशिक ग्रामीण साहित्य संशोधन<br>*प्रा. डी. टी. जाधव* | 35-45 |
| ७. | संशोधन स्वरूप आणि पद्धती<br>*डॉ.दिलीप पी.पवार* | 46-51 |
| ८. | लोकसाहित्याच्या अभ्यासाची नवी दिशा<br>*प्रा.डॉ. सुरेश विनायक जाधव* | 52-59 |
| ९. | संशोधनाचे स्वरूप : साहित्याच्या संदर्भात<br>*प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलीक पाटील* | 60-64 |
| १०. | संशोधनः स्वरूप, प्रकार आणि संशोधन पद्धती<br>*प्रा. डॉ. राहुल अशोक पाटील* | 65-74 |

| | | |
|---|---|---|
| ११. | साहित्यातील स्त्री समस्यांचे दर्शन : व्यापक दालन<br>*प्रा.डॉ. सुरेखा हरी जाधव* | 75-79 |
| १२. | भाषांतर : स्वरूप आणि मीमांसा<br>*डॉ. शोभा डहाळे* | 80-84 |
| १३. | भाषातर अभ्यासातील संशोधन पद्धती<br>*प्रा. दीपक ब. गायकवाड* | 85-92 |
| १४. | साहित्य संशोधनामध्ये मानसशास्त्राची भूमिका<br>*प्रा. सारिका राजेंद्र थोरात* | 93-99 |
| १५. | मराठी ग्रामीण साहित्यातील स्थित्यंतरांचे संशोधन<br>*प्रा. भवर अशोक दत्तात्रय* | 100-104 |
| १६. | बंजारा बोलीतील भाषिक भेद<br>*प्रा.व्ही.बी.राठोड* | 105-118 |

## हिंदी विभाग :


| | | |
|---|---|---|
| १७. | अनुसंधान कार्य : एक दृष्टिक्षेप<br>*डॉ. नितीन पाटील* | 119-124 |
| १८. | हिंदी अनुसंधान के क्षेत्र में विभिन्न संभावनाएँ<br>*डॉ. पी. व्ही. कोटमे* | 125-133 |
| १९. | हायकु काव्य धारा : एक अनुसंधान<br>*प्रा. डॉ. शैलजा जायसवाल* | 134-140 |
| २०. | भाषा में तुलनात्मक अनुसंधान एक दृष्टिकोन<br>*प्रा.डॉ.सौ. मिनल प्रमोद बर्वे* | 141-144 |
| २१. | मधु कांकरिया का उपन्यास 'पत्ताखोर' में सामाजिक दृष्टि<br>*प्रा. मंगला पाडूंरंग भवर* | 145-148 |
| २२. | साहित्यिक अनुसंधान एक यथार्थ<br>*प्रा.मनिषा नाठे* | 149-152 |

## इतिहास विभाग :


| | | |
|---|---|---|
| २३. | इतिहासातील पुरातत्वीय संशोधन<br>*प्रा. शंकर का. राजोळे* | 153-156 |
| २४. | इतिहासातील पुरातत्त्वीय संशोधनाचे महत्त्व<br>*प्रा. श्री. सोनवणे आर. आर* | 157-161 |
| २५. | इतिहासात पुरातत्त्वशास्त्र संशोधनाचे महत्व<br>*प्रा. संगीता बी. चव्हाणके* | 162-166 |
| २६. | पुरातत्वशास्त्रातील विविध कालमापन पध्दतीचे स्वरूप व त्यांचे महत्व<br>*दिलीप शंकरराव तेलंग* | 167-174 |

**3**

# भाषा आणि साहित्य संशोधनातील नवे मार्ग

**डॉ.राजेंद्र रामकृष्ण सांगळे**

*के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय,नाशिक*

## प्रास्ताविक

जगात अनेक भाषा असून त्या त्या भाषेमध्ये तेथील साहित्याची निर्मिती प्रक्रिया सुरु असते. साहित्याची निर्मिती ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. कवी, लेखक ,कलावंत हे आपल्याप्रतीभाशात्कीच्या जोरावर भाषेच्या आधाराने नवनिर्मिती करीत असतात. भाषा आणि साहित्य या अतिशय व्यापक अशा संकल्पना असून त्या त्या देशात लोकसंख्येनुसार त्यांचा विस्तार प्रचंड प्रमाणात झालेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भाषा म्हणजे मराठी आणि साहित्य म्हणजे मराठी ललित साहित्य आणि त्यातील संशोधनाचे नवे मार्ग या अनुषंगाने मर्यादा घालून घेतली आहे. कारण संशोधन ही अतिशय व्यापक अशी संकल्पना आहे. जगात आणि देशात वेगवेगळ्या ठिकाणी मानवी गरजेतून तर कधी चिकित्सक वृत्तीने कुतूहलापोटी वेगवेगळया विषयात अव्याहतपणे संशोधनाचे काम सुरु आहे.

संशोधनाला इंग्रजीत Reserch असे म्हणतात. Reserch म्हणजे पुन्हा पुन्हा शोधणे. जे.डब्ल्यू वेस्ट, मोझर, स्लेसिंजर व स्टीफेन्सन अशा पाश्चात्य विद्वानांनी अनके व्याख्यांच्या माध्यमातून संशोधन म्हणजे काय हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी भाषा आणि साहित्याचा विचार करता आपल्या परंपरांचा शोध घेण्याच्या प्रेरणेतून मराठीत संशोधनाला सुरुवात झाली. संशोधनाचे काम हे अतिशय चिकाटीचे, जिद्दीचे व संयमाचे असते. संशोधन करीत असतांना संशोधकाला बऱ्याच पातळीवर परिश्रम करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते. संशोधकाच्या विषयीचा आदरभाव व्यक्त करतांना डॉ.ग.श्री.खैर म्हणतात, "संशोधक या शब्दामध्ये एक जादू भरलेली आहे. तो शब्द ऐकल्याबरोबर आपल्या मनात आदराची भावना उत्पन्न होते आणि जन्मभर विद्या–व्यासंगाला वाहून घेणाऱ्या विद्वानाचे व्यक्तिमत्व डोळ्यांपुढे उभे

राहते." त्यामुळेच संशोधनाचे काम करणारा कुठलाही संशोधक समाजाच्या आदराचा आणि कुतूहलाचा विषय ठरतो. शिवाय हे डॉ.ग.श्री.खैर म्हणतात त्याप्रमाणे, "संशोधन हे काम सवडीचे व आवडीचे आहे."एकूणच संशोधका विषयीचा समाजातील आदरभाव पहिला तर संशोधनाचे काम हे अत्यंत जबाबदारीचे आणि बांधिलकी व दायीत्वाचे आहे . त्यामुळे ते तितकेच गंभीरपणे आणि जबादारीने करणे गरजेचे असते.त्यामुळेच संशोधन हे मौलिक व दर्जेदार असायला हवे अशी अपेक्षा समाजाला संशोधकाकडून असते. अशावेळी ही गोष्ट अत्यंत जबाबदारीने करणे महत्वाचे ठरते.

संशोधनाचे खरे यश यश हे त्या विषयाच्या निवडप्रक्रियेत असते. संशोधनासाठी योग्य विषयाची निवड केली आणि परिश्रमपूर्वक मन लावून काम केले तर भरीव अशी कामगिरी संशोधकाच्या हातून होऊ शकते. ईस्ट इंडिया कंपनीच्या कलकत्ता येथील उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असलेल्या विल्यम जोन्स(१७४६ -१७९४)या विद्वान पंडीतामुळे आपल्याकडे आपल्याकडे जाणीवपूर्वक संशोधन करण्याची प्रथा सुरु झाली. विल्यम हे ग्रीक, लॅटिन, जर्मन, फ्रेंच या युरोपीय व अरबी, फारसी अशा अनेक भाषांचे तज्ज्ञ होते. भारतात आल्यावर न्यायालयीन कामकाजाच्या निमित्ताने पारंपरिक हिंदु कायदा समजावून घेण्यासाठी ते संस्कृत भाषा जाणीवपूर्वक शिकले. संस्कृतचा अभ्यास करीत असताना ग्रीक व लॅटिन भाषेशी असणारे संस्कृतचे साम्य त्यांच्या लक्षात आले. या भाषिक साम्याच्या आधारे त्यांनी असा निष्कर्ष काढला की, ज्या अर्थी या भाषांमध्ये साम्य आहे त्या अर्थी त्या बोलणा–यांचे पूर्वज पूर्वी कुठे तरी नक्की एकत्र राहत असले पाहिजेत आणि या भाषांना जन्म देणारी एक मूळ भाषा असली पाहिजे असा सिद्धांत त्यांनी मांडला.या साठी त्यांनी एका जननी भाषेची कल्पना माडली. आणि या कल्पित भाषेचे त्यांनी 'इंडो–युरोपियन' असे नामकरण केले. भारतीय भाषांच्या संशोधनाचे काम विस्तृतपणे करण्यासाठी त्यांनी इ.स. १७८४ मध्ये त्यांनी 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' ही संस्था स्थापन केली. तिचे उद्दिष्ट " आशियाचा प्राचीन इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्रे व वाङ्मय इत्यादींचा अभ्यास करणे" हे होते. आशिया खंडातील हा पहिलाच संशोधनविषयक प्रयोग होता.

संशोधन ही अतिशय व्यापक व विस्तृत अशी संकल्पना आहे . कोलीअरच्या विश्वकोशात 'संशोधन' (रिसर्च) या सदराखाली संशोधनाच्या जवळ जवळ अठरा विविध क्षेत्रांचा उल्लेख आला आहे. मात्र यातील विलक्षण व ठळकपणे नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे यात वाड्मयाला स्थान नाही. पण आज मात्र वाड्मयाच्या संशोधनाला विशेष महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते 'पाठचिकित्से' सारख्या गोष्टीपासून सुरु झालेला वाङ्मय संशोधनाचा हा प्रवास आज साहित्य आणि भाषेच्या अनेक वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करीत संशोधन क्षेत्रात मौलिक भर टाकत आहे. कुठल्याही

संशोधनात विषयाची निवड हा अतिशय महत्वाचा असा टप्पा आहे. असे म्हटले जाते की योग्य विषयाच्या निवडीत तुमच्या संशोधनाचे अर्धे काम झालेले असते.

भाषा आणि साहित्याचे संशोधन करीत असतांना संशोधनाची अनेक क्षेत्रे तुम्हाला खुणावीत असतात. मराठी भाषेची समृद्धता आणि विविधता पहिली तर मराठीत भाषिक संशोधनाचे अनेक नवे मार्ग दिसून येतात. मराठीत मोठया प्रमाणात प्रदेशनिहाय बोली भाषेची विविधता दिसून येते. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश यासारखे महत्वाचे व मोठे प्रादेशिक विभाग आहे. या प्रादेशिक विभागातून वऱ्हाडी, अहिराणी, खानदेशी, कोकणी, मालवणी, मराठवाडी, वैदर्भी यासारख्या विविध बोली बोलल्या जातात. या बोलींची स्वत:ची अशी स्वतंत्र भाषिक व्यवस्था आणि रचना असते. स्वत:चे व्याकरण तसेच काही संकेत असतात. या बोलींचा भाषिक दृष्टीकोनातून अभ्यास केल्यास त्यांचे भाषिक नियम, संकेत, संकर, भेद, संस्कृती, इतिहास, सामाजिक नीती नियम, रूढी, परंपरा यांचा शास्त्रशुद्ध उलगडा होवून अनेक नवीन तथ्ये संशोधनांती उजेडात येऊ शकतात. अगदी नाशिक जिल्ह्याचा विचार केला तर नाशिकच्या उत्तर भागातम्हणजे दिंडोरी, कळवण आणि सुरगाण या तालुक्यांमध्ये आदिवासी भागात कोकणी बोली (ही कोकणी बोली किनारपट्टीच्या कोकणी बोलीपेक्षा वेगळी आहे ) मोठया प्रमाणात बोलली जाते. या बोलीचा वरील पद्धतीने अभ्यास करून मौलिक संशोधन होऊ शकते.

जागतिकीकरणाच्या वाढत्या रेट्यमुळे भाषेचे व्यवहारिक महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. आज मराठी भाषा ही केवळ साहित्यापुरती मर्यादित न राहता व्यवहारातील अनेक क्षेत्रात तिचा वापर मोठया प्रमाणत होतांना दिसतो आहे. मराठीच्या संशोधनाचा विचार करीत असतना केवळ मौखिक अथवा लिखित साहित्य संशोधनापुरता विचार करून चालणार नाही तर व्यावहारिक मराठीचाही येथे विचार करणे गरजेचे आहे. व्यावहारिक मराठी म्हणजे काय ? असा प्रश्न जेव्हा आपण विचारतो किंवा उपस्थित होतो तेव्हा त्याचे उत्तर अगदी साधे, सोपे आणि सरळ असते. दैनदिन जीवनातील माणसांचे सर्व प्रकारचे व्यवहार ज्या भाषेतून होतात तिला आपण त्या समुदायाची किंवा त्या प्रदेशाची व्यावहारिक भाषा म्हणतो. साहित्याची भाषा आणि व्यवहारिक भाषा यात फरक असतो. व्यावहारिक भाषेचे कार्यक्षेत्र हे प्रचंड मोठे व विस्तारलेले आहे. अशावेळी या भाषेचे आणि भाषिक क्षेत्राचे स्वतंत्र संशोधन होणे गरजेचे असते. व्यावहारिक भाषेत अनेक गोष्टींचा समावेश होतो. जसे सरकारी कार्यालयातील भाषा, न्यायालयातील मराठीचे स्वरूप, प्रसारमाध्यमांची भाषा व दिवसेंदिवस बदलत चालेलेले तिचे स्वरूप, टी.व्ही. मालिकांची, कार्यक्रमांची भाषा, आकाशवाणी वरील भाषा , जाहिराती यातील भाषेच्या सूक्ष्म बदलांचा संशोधन करून शेध घेता

येईल. शासन निर्णय, शासकीय अहवाल, शासनाची मुखपत्रे यातील भाषेच्या बदलत्या स्वरूपाचे संशोधन कर्ता येईल. दृक्श्राव्य प्रसारमाध्यमातील विविध प्रकारच्या जाहिराती हा तर स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. आकाशवाणी , दूरदर्शनवर सुरु असलेल्या विविध कार्यक्रमाच्या लिखित संहिता घेवून त्यावर संशोधन करता येईल. याच पद्धतीने मालिकांच्या पटकथांचा अभ्यास करता येईल. नाटक आणि कादंबऱ्यांची होणारी माध्यमांतरे यांचाही वेगवेगळ्या दृष्टीकोनातून विचार केला तर सध्याच्या काळात संशोधनाला अनेक नवे विषय येथून मिळू शकतात. सध्या गाजत असलेले 'कट्यार काळजात घुसली' आणि 'नटसम्राट' हे दोन्ही मराठी चित्रपट मराठीतील नाटकांची माध्यमांतरे आहे. नाटकांच्या प्रमाणेच मराठीतील शाळा, नटरंग, बनगरवाडी, दुनियादारी अशा गाजलेल्या कादंबऱ्यांवर चित्रपट निर्माण झाले आहे. एक साहित्यप्रकार घेवून अशा प्रकारचे संशोधन करता येऊ शकते.

दृक्श्राव्य प्रसारमाध्यमांच्या प्रमाणेच वृत्तपत्रांचा आणि त्यातील भाषेचा अभ्यास करता येऊ शकेल. मराठीत लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, सकाळ, तरुण भारत, दिव्य मराठी, सामना, पुढारी, नवाकाळ, देशदूत, गावकरी, प्रहार यासारखी अनेक वर्तमानपत्रे दररोज निघतात. या वर्तमानपत्रांचे वैशिष्टय म्हणजे या वर्तमानपत्रांमधून राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील एकाचा आशयाची बातमी वेगवेगळ्या पद्धतीने दिली जाते. आशय एकच असला तरी वर्तमानपत्रांच्या हेडलाईनची भाषा मात्र वैविध्यपूर्ण व वेगवेगळी असते. उदा. भारताने क्रिकेटच्या सामन्यात पाकिस्तानचा पराभव केला. या आशयाची बातमी वर्तमानपत्रात दुसऱ्या दिवशी वेगवेगळ्या पद्धतीने छापून आलेली दिसते. अशावेळी एकाच वर्षातील दोन किंवा तीन वर्तमानपत्रांची निवड करून वर्तमानपत्रांच्या मुख्य बातमीच्या भाषिक बदलाचा अभ्यास करता येणे शक्य आहे. शिवाय वर्तमानपत्रातील इतर अनेक सदरे या अभ्यासाचा भाग होऊ शकतील. मराठीतील अनेक वर्तमानपत्रे दर रविवारी किंवा आठवड्यातील एखादया निश्चित दिवशी पुरवणी काढीत असतात. मराठीत लोकसत्ताची दृलोकरंग, महाराष्ट्र टाईम्सची – संवाद, सामनाची –उत्सव, लोकमतची–मंथन अशा पुरवण्या वाचकांमध्ये खूपच लोकप्रिय आहे. या पुरवण्यांमधून नवोदित तसेच प्रस्थापित लेखक दर्जेदार अशा ललित साहित्याचे लेखन करीत असतात. अशावेळी 'मराठी वर्तमानपत्रांच्या रविवार पुरवण्यांचे वाङ्मयीन योगदान' किंवा ' या पुरवण्यांमधून होणाऱ्या साहित्यव्यवहाराचे स्वरूप' अशा प्रकारचा विषय घेवून स्वतंत्र संशोधन उभे राहू शकते. महाराष्ट्रात विद्यापीठ स्तरावर मराठी साहित्य आणि भाषेच्या संदर्भात अनेक लहान मोठी चर्चासत्र किंवा परिसंवाद होत असतात. ही चर्चासत्रातील साहित्य विचार व भाषिक विचार यांचा संशोधनासाठी विचार करता येऊ शकेल. अशा प्रकारच्या

संशोधनातून या चर्चासत्रांची भाषेच्या अभिवृद्धीकरिता काय उपयुक्तता आहे हे ही सांगता येईल. संशोधनाअंती अशा चर्चासत्र आणि परिसंवादांचे भाषिक व वाड्मयीन योगदान सांगता येईल.

साहित्याचे लिखित आणि मौखिक असे दोन प्रमुख प्रकार पडतात. मराठी साहित्याला अत्यंत समृद्ध आणि दीर्घ अशी मौखिक परंपरा लाभली आहे. या मौखिक साहित्यालाच आपण लोकसाहित्य असे म्हणतो. लोकसाहित्यात आतापर्यंत झालेल्या संशोधनाचे विषय पाहिले तर असे लक्षात येते अजूनही अनेक विषय दुर्लक्षित आहे. उदा. नाशिक जिल्ह्याचा विचार केला तर भिल्ल जातीच्या बोलीचा अत्यंत त्रोटक अभ्यास झाल्याचे दिसून येते. अशावेळी या संपूर्ण बोलीचा समाज भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो. शिवाय या जातीतील प्रथा, परंपरा, सण, उत्सव, लोकदैवते , लोककथा, लोकगीते, विधी प्रसंगी म्हणावयाची गीते, खेळगीते, नृत्य, नृत्यगीते ,वेशभूषा, राहणीमान इत्यादींचा विचार करूनही वेगळ्या प्रकारचे व नवे संशोधन होऊ शकते. महाराष्ट्रातील भाषेची आणि जातीची, धर्माची विविधता पाहिल्यावर कोकण, मराठवाडा, विदर्भ अशा प्रदेशातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील अनेक जाती, धर्माचा अशा प्रकारे अभ्यास करणे शक्य आहे. लोकसाहित्याची आणि क्षेत्रीय कार्याची आवड असणाऱ्या संशोधकांनी जरूर अशा विषयांकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन हे विखुरलेले लोक संचित शब्दबद्ध करणे गरजेचे वाटते. लोकसाहित्यातील म्हणी, उखाणे, कोडी, सुभाषिते इत्यादींचा समाजशास्त्रीय, भाषाशास्त्रीय, मानववंश या दृष्टीने अभ्यास करता येऊ शकतो.

याशिवाय एखादया कलाकृतीला मध्यवर्ती ठेवून तिचे साहित्यकृतीनिष्ठ संशोधन करता येते. आशयानुसार अशा कलाकृतीचे आशयनिष्ठ संशोधनही मौलिक स्वरूपाचे ठरू शकते. मार्क्सवादी , स्रीवाद, समाजशास्त्रीय, जीवनवादी, नितीवादी, देशीवादी अशा वेगवेगळा दृष्टीकोन स्वीकारीत नवा विषय घेऊन , एक साहित्यप्रकार निश्चित करून तर कधी एकापेक्षा दोन साहित्यप्रकार घेवून अशा पद्धतीचे संशोधन करता येते. काही ठळक मानवी भावनांच्या आधारेही एखादा साहित्यप्रकार निवडून चांगल्या प्रकारचे संशोधन करता येते. उदा. एखादया कालखंडातील किंवा एखादया ठराविक कवीच्या कवितेतील 'विरह' ,प्रेम. इत्यादी. याच पद्धतीने मानवी नात्यांचा शोधही साहित्यातून घेता येऊ शकतो. उदा.मराठी कवितेतील, कादंबरील आई, मातृभावना, पिता इत्यादी.

ऐतिहासिक दृष्टीनेही साहित्याचे संशोधन होऊ शकते. मराठी साहित्यात रामायण, महाभारत, शिवाजी महाराज, पानिपतचा रणसंग्राम या विषयांवर विपुल प्रमाणात साहित्याची निर्मिती झाली आहे. यात कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणून आपण जिचा उल्लेख करतो ती रा.भी.गुंजीकारांची मोचनगड १८७१ साली प्रकाशित झाली. तेव्हापासून मराठीत

ऐतिहासिक कादंबऱ्यांचा ओघ सुरु झाला. नाथमाधव, ह.ना.आपटे , ना,स,इनामदार, शिवाजी सावंत, रणजीत देसाई, विश्वास पाटील यांनी मराठी ऐतिहासिक कादंबरी समृद्ध करण्याचे काम केले. या क्षेत्रात मोठया स्वरूपात संशोधनाला वाव आहे. या कादंबऱ्यामधील समान विषय किंवा सूत्र घेवून विषय निश्चित करता येऊ शकेल. उदा. आजपर्यंत 'शिवाजी महाराजांच्या जीवनावर अनेक कादंबऱ्यांचे लेखन झाले.अशावेळी 'मराठी कादंबरीतील 'शिवाजी' , किंवा 'कर्ण' अशी विषयाची चौकट तयार करून मार्यदाआखून घेतली तर अभ्यासाला नेमकेपणा देता येतो. यातील काही विषयांवर संशोधन झाले असण्याची शक्यता आहे.पण अशा पद्धतीने संशोधन होऊ शकते म्हणून ही उदाहरणे येथे दिली आहे. पानिपतचा रणसंग्राम हा सर्व मराठी रसिकांचा आणि जनतेचा जिव्हाळ्याचा विषय. अहमदशहा अब्दाली आणि सदाशिवभाऊ पेशवे यांच्यात १७६१ साली झालेल्या तिसऱ्या पानिपत युद्धात मराठी सैन्याचा मोठा पराभव झाला. पुढे 'पानिपत' हा अनेक मराठी लेखकांच्या कादंबरीचा मुख्य विषय झाला. 'पानिपत' या विषयावर सर्वप्रथम नागेश विनायक बापट यांनी १८९७ साली 'पानिपतची मोहीम' ही कादंबरी लिहिली. तेव्हापासून आतापर्यंत या विषयावर अनेक लेखकांनी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. इतिहासाची आवड असेल तर या सर्व कादंबऱ्यांचा एकत्रित विचार करून पानिपत सारख्या ऐतिहासिक विषयावर मौलिक असे संशोधन होऊ शकते.

संशोधनासाठी तौलनिक पद्धतीचाही विचार अनेक नवे विषय देणारा ठरू शकतो. दोन कलाकृतीत काही समान दुवे शोधून तौलनिक अभ्यास करता येतो. तुलनेसाठी निवडलेल्या साहित्यकृतीमध्ये काळ, लेखक, विषय, भाषा , संस्कृती अशी समान सूत्रे शोधून संशोधन करता येते.

मराठी साहित्यात नाट्य वाङ्मयाची समृद्ध अशी परंपरा आहे. नाटक या साहित्यप्रकाराला जसे वाङ्मयीन मूल्य असते तसे त्यास प्रायोगिक मूल्यही असते. त्यामुळे नाटक हा एक महत्वाचा साहित्यप्रकार आहे. संगीत रंगभूमीची वैभवशाली परंपरा असलेल्या मराठी नाटकांमध्ये त्या त्या काळातील सामाजिक प्रश्नाची सुद्धा चर्चा आढळून येते. मराठीत अनेक समस्याप्रधान नाटके दिसून येतात. या नाटकांमधून विधवांचे प्रश्न, बालजरठ विवाह अशा स्त्री प्रश्नाच्या बरोबरच इतर अनेक सामाजिक प्रश्नांची आणि समस्यांची चित्रणे प्रभावीपणे दिसून येतात. नाटकातील स्वगते, संवाद आणि भाषा आपले लक्ष वेधून घेतात. अशा प्रकारची भाषा असणाऱ्या अजून काही नाटकांसह 'नाटकाच्या संवादांचा आणि भाषेचा' सुद्धा अभ्यास करता येवू शकतो.

संशोधन ही निरंतन चालणारी प्रक्रिया असून मानवजातीच्या विकासास हातभार लावणारी अत्यंत महत्वपूर्ण अशी मौलिक प्रक्रिया आहे. दु.का.संत म्हणतात त्याप्रमाणे , 'जगाच्या प्रगतीची गुरुकिल्ली 'संशोधना'त आहे'. त्यामुळे केवळ एखाद्या पदवीपुरते किंवा काही हेतुपुरते आपले संशोधन मर्यादित न ठेवता आपल्या वाङ्मयीन वारशाचा व पूर्वसुरींनी घालून दिलेल्या समृद्ध परंपरेचा आदर्श डोळ्यसमोर ठेवून एका उच्च ध्येयाने प्रेरित होवून संशोधनासारख्या सर्जनशीलतेला, शोधवृत्तीला उजाळा देत राहिले पाहिजे. यातच समाजाचे आणि भावी पिढीचे हित दडलेले आहे.

## संदर्भ

*डॉ.संत दु.का., 'संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग', पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.*

*प्रा.पाटील व्ही.बी., 'संशोधन पद्धती', श्री.मंगेश प्रकाशन,नागपूर.*

*पाटणकर जयश्री, 'संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.*

*डॉ.ताटके नीलम, 'संशोधन करताना...', डायमंड पब्लिकेशन,पुणे.*